# दरपत्रके मागविण्याची दुसरी वेळ

9 JUL 2018

जा.क्र. पोआअ/प्रबंधक शाखा/वेल्डींग मशिन-पुरवठा/7559 /२०१८ अमरावती शहर दिनांक - ९/०७/२०१८

**विषय :-** वेल्डींग मशिन खरेदी करण्याकरीता दोन लिफाफा पध्दतीनुसार दरपत्रके सादर करणे बाबत.

-००००-

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, या कार्यालयाकरीता वेल्डींग मशिन खरेदी करावयाची असल्याने या कार्यालयाचे दिनांक १३/६/२०१८ चे पत्रान्वये अधिकृत विक्रेता/पुरवठादार/वितरक यांचेकडून दोन लिफाफा पध्दतीनुसार सिलबंद दरपत्रके मागविण्यात आले होते. तथापि प्राप्त दरपत्रकापैकी दोन पुरवठादार तांत्रिकदृष्ट्या कागदोपत्री अपात्र टरल्याने पुन्हा दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

तरी ईच्छूक अधिकृत विक्रेते/पुरवठादारांनी वेल्डींग मशिन चे बाजारभावावर आधारीत दरानुसार दोन लिफाफा पध्दतीनुसार सिलबंध दरपत्रके या कार्यालयातील प्रबंधक शाखेत दिनांक १६/०७/२०१८ ला १०.०० वाजेपर्यंत पर्यंत (शासकीय सुट्टि वगळून) सादर करावीत. पहिला लिफाफा हा तांत्रिक लिफाफा म्हणून (विवरणपत्र-१) आणि दुसरा लिफाफा (विवरणपत्र-२) असे दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रके सादर करणे अनिवार्य आहे. तांत्रिक लिफाफ्यामध्ये खालील आवश्यक कागदपत्रे असणे अनिवार्य आहे.

१. पुरवठादारांचे फर्म नोंदणी प्रमाणपत्र (शॉपॲक्ट लायन्संस झेरॉक्स प्रत)  २. GST प्रमाणपत्राची छायांकीत प्रत
३. पॅन कार्डची छायांकीत प्रत  ४. अधिकृत विक्रेते असल्याचे प्रमाणपत्र

तांत्रिक लिफाफा (विवरणपत्रा-१) मध्ये वर नमुद केलेले आवश्यक कागदपत्रे आढळून आल्यानंतरच दरपत्रकाचा दुसरा लिफाफा (विवरणपत्र-२) उघडण्यात येईल. याची कृपया निविदाधारकांनी नोंद घ्यावी. प्राप्त झालेली दरपत्रके उघडण्याबाबतचा दिनांक व वेळ संबधीतांना दुरध्वनीद्वारे/ई-मेलद्वारे सूचीत करण्यात येईल. सदरचे पत्र हे या कार्यालयाचे www.amravaticitypolice.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा अपलोड करण्यात आलेले आहेत. तरी ईच्छूक अधिकृत विक्रेते/पुरवठादारांनी दोन लिफाफा पध्दतीनुसार दरपत्रके या कार्यालयास विहीत मुदतीत सादर करावीत हि विनंती.

(एम.एच. बैस)
कार्यालय अधिक्षक
पोलीस आयुक्त,अमरावती करीता.

प्रति,

१) मे. अजय इलेक्ट्रीकल, सतीधाम नगर, रॉयली प्लॉट्र अमरावती

२) मे. श्री.ट्रेडींग कंपनी, रॉयली प्लॉट्र अमरावती

३) मे. कृषी सहयोग केंद्र, रॉयली प्लॉट्र अमरावती

प्रत, सपोनि , सायबर सेल,

२/- उपरोक्त पत्र हे या कार्यालयाचे www.amravaticitypolice.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करून अपलोड केल्याबाबतची प्रत कृपया प्रबंधक शाखेत परत करावी.



Scanned by CamScanner